**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव — काशिनाथ दत्तराम मरपडवाड,
वय - ६५ वर्षे धंदा - शेती,
रा. धसवाडी, ता. अहमदपूर जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे</u>**

**०१.** आरोपींना मी ओळखतो, ते न्यायालयात हजर आहेत. मी धसवाडी येथील शेतात राहतो. घटना एक वर्षापुर्वी पावसाळयाच्या दिवसात दुपारी ३.०० वाजता झाली होती. घटनेच्या दिवशी मी, माझी पत्नी, मुलगा माधव व सून पुजा आमचे शेतातील आखाडयावर बसलो होतो. आरोपी ज्ञानेश्वर फवारणी करीत आमचे शेतात असलेल्या आखाडयाचे समोर आला. मी त्याला फवारणी करु नको असे म्हणालो. आरोपी ज्ञानेश्वर याने मला शिवीगाळ केली व त्यांचे घरातील लोकांना आवाज दिला. त्यानंतर इतर आरोपी नामे नवनाथ, नागनाथ, तुकाराम, प्रकाश हे काठया घेवून घटनास्थळावर आले. आरोपींनी आम्हाला मारण्यास सुरुवात केली. आरोपी नवनाथ व नागनाथने मला काठीने हातावर व पाठीवर मारले. आरोपी नागनाथने दगडानेही मला मारहाण केली. आरोपींनी माझे तोंडावर मिरची टाकून मारले. आरोपी प्रकाशने डोक्यात काठी मारल्याने मी चक्कर येवून खाली पडलो होतो. घटनेच्या वेळी आरोपी पार्वती, शोभा, कोंडाबाई व रुक्मीणीबाई त्यांनी माझे तोंडावर हाताने व लाथा-बुक्कयांनी मारले. आरोपी शोभा माझी सून पूजा हिच्या पोटात लाथ मारली. आरोपींनी माझा मुलगा माधव यालाही काठयांनी मारले होते. मारहाणीनंतर आरोपी निघून गेले. पोलिसांनी माझे टिपन नोंदविले होते. आता मला जप्त चार काठया वस्तु अ व दोन दगड वस्तु ब दाखवले, याच वस्तुंनी मला, माझा मुलगा व सुनेला मारहाण करण्यात आली होती.

सरतपास पुर्ण.

**<u>आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.व्ही. देशमुख यांच्यामार्फत सुरु</u>:-**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील शेताबाबत आरोपी व आमच्यात पुर्वीपासून वाद आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे घर धसवाडी गावात आहे. गाव व

घटनास्थळावरील शेत यामध्ये तीन किमी इतके अंतर आहे. मी पोलिसांना आरोपी नवनाथ व नागनाथने मला काठीने हातावर व पाठीवर मारले. आरोपी नागनाथने दगडानेही मला मारहाण केली. आरोपींनी माझे तोंडावर मिरची टाकून मारले. आरोपी प्रकाशने डोक्यात काठी मारल्याने मी चक्कर येवून खाली पडलो होतो. घटनेच्या वेळी आरोपी पार्वती, शोभा, कोंडाबाई व रुक्मीणीबाई त्यांनी माझे तोंडावर हाताने व लाथा-बुक्कयांनी मारले, हे सांगितले होते, ते माझे बयाणात का नमूद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. जप्त काठया माझ्या शेतातील बाभळीच्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आखाडयावर ठेच लागून पडल्यामुळे माझे पत्नीला मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे मला मारहाण झाली, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेतात पडल्यामुळे मला मार लागलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी मला मारहाण व शिवीगाळ केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, शेताचे वादावरुन आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली व खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक -१२.०९.२०२५

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की -
माझे नांव – सावित्राबाई काशिनाथ मरपडवाड,
वय - ६५ वर्षे धंदा - शेती,
रा. धसवाडी, ता. अहमदपूर जि. लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती ए.एन. काकडे</u>**

**०१.** आरोपींना मी ओळखते, ते न्यायालयात हजर आहेत. घटना एक वर्षापुर्वी पावसाळयाच्या दिवसात एकादशीच्या दिवशी दुपारी ३.०० वाजता झाली होती. घटनेच्या दिवशी मी, माझे पती, मुलगा व सून आमचे शेतात असलेल्या घराचे अंगणात बसलो होतो. आरोपी ज्ञानेश्वर फवारणी करीत आमचे शेतात असलेल्या जनावरांचे दावणीपर्यंत आला. त्याला माझे पती फवारणी करु नका असे म्हणाले. आरोपी ज्ञानेश्वर त्यांना शिवीगाळ करु लागला. त्यानंतर इतर आरोपी काठया घेवून घटनास्थळावर आले. आरोपी ज्ञानेश्वरने काठीने माझे पतीला मारले. आरोपी शोभा, रुक्मीणी व पार्वती यांनी मला दगडाने व लाथा-बुक्क्यांनी मिरचीची पुड डोळयात टाकून मला मारहाण केली. आरोपी शारदा, कोंडाबाई व निकीता यांनी माझी सून पूजा हिला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. घटनेनंतर आम्ही पोलीस ठाण्यात गेलो. त्या ठिकाणी मी आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली. आता मला मी दिलेली फिर्याद वाचून दाखवली. त्यावर माझा सही निशाणीचा अंगठा लावलेला आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. फिर्यादीला **<u>नि.क्र.५३</u>** देण्यात येते. त्यानंतर पोलिसांनी दिलेल्या यादीप्रमाणे आम्ही किनगांव येथील सरकारी दवाखान्यात उपचार घेतले. जप्त काठया व दगड मला दाखविल्यास मी ओळखू शकते. आता मला जप्त चार काठया व दोन दगड दाखवले, याच वस्तुंनी मला, माझे पतीला व सुनेला मारहाण करण्यात आली होती. जप्त चार काठयांना एकत्रितरित्या वस्तु अ व जप्त दोन दगडांना एकत्रितरित्या वस्तु ब संबोधण्यात येते. पोलिसांनी घटनेच्या दुसऱ्या दिवशी पंचनामा केला होता. आम्हाला मारहाण केलेल्या जप्त काठया व दगड घटनास्थळावर पडून होते, ते मी पोलिसांना पंचनाम्याच्यावेळी दाखवले होते. आता मला छापील फिर्याद दाखवली.त्यावर माझा सही निशाणीचा अंगठा लावलेला आहे. त्यातील

मजकूर खरा व बरोबर आहे. छापील फिर्यादीला **नि.क्र.५४** देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

**आरोपींतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री.एस.व्ही. देशमुख यांच्यामार्फत सुरु:-**

**०२.** मला लिहिता-वाचता येत नाही. माझी फिर्याद पोलिसांनी लिहिली, त्यावर मी अंगठा लावला होता. फिर्याद लिहिणाऱ्या पोलिसांचे नाव मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटना ज्या ठिकाणी झाली, तेथे आरोपींचा जनावरांचा आखाडा आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील शेताबाबत आरोपी व आमच्यात पुर्वीपासून वाद आहे. गणपती जमलवार आमचे नातेवाईक आहेत. गणपती माझे बहिणीचा पती आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी व आम्ही घटनास्थळावरील शेतीचे मालक असल्याचे कथन करीत आहोत, त्यामुळे त्या संबंधीचा वाद न्यायालयात प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळावरील शेताची मशागत, पेरणी आरोपी करतात. हे म्हणणे खरे आहे की, धसवाडी गावात आमचे घर आहे. घटनास्थळावरील शेताचा गट क्र.६५ असा आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी नागनाथ, तुकाराम, पार्वती, शोभा, शारदा, रुक्मीणीबाई व निकीता हे धसवाडी गावात राहतात. आरोपी काशीनाथ व ज्ञानेश्वर हेही गावात राहतात. धसवाडी गाव ते घटनास्थळावरील शेत यामध्ये दोन ते तीन किमी अंतर असेल. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी मी, माझे पती व सून यांचे व्यतिरीक्त आजूबाजूचे कोणतेही शेतकरी अथवा साक्षीदार हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, घटनेचा आवाज ऐकल्यानंतरही कोणतेही शेजारी घटनास्थळावर आले नव्हते.

**०३.** फिर्याद घटनेच्या दिवशी संध्याकाळी ५.०० वाजता दिली. हे म्हणणे खरे आहे की, मी, माझे पती व सून विचार करुन घटनेनंतर पोलिस ठाण्यात आलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, घटना एक वर्षापुर्वी पावसाळ्याच्या दिवसात एकादशीच्या दिवशी दुपारी ३.०० वाजता झाली होती, घटनेच्या दिवशी मी, माझे पती, मुलगा व सून आमचे शेतात असलेल्या घराचे अंगणात बसलो होतो हे मी खोटे सांगत आहे. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपी ज्ञानेश्वर फवारणी करीत आमचे शेतात असलेल्या जनावरांचे दावणीपर्यंत आला, त्याला माझे पती फवारणी करु नका असे म्हणाले, आरोपी ज्ञानेश्वर त्यांना शिवीगाळ करु लागला, त्यानंतर इतर आरोपी काठया घेवून घटनास्थळावर आले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ज्ञानेश्वरने काठीने माझे पतीला मारले, आरोपी शोभा, रुक्मीणी व पार्वती यांनी मला दगडाने व लाथा-बुक्क्यांनी मिरचीची पुड डोळयात टाकून मला मारहाण केली, आरोपी शारदा, कोंडाबाई व निकीता यांनी माझी सून पूजा हिला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, शेताचे वादावरुन आरोपींच्या विरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

**फेर तपास** काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-

**( आर.डी. वाबळे )**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
अहमदपूर.

दिनांक -१२.०९.२०२५